**ठळक बातम्या**

- भारत आणि स्वित्झर्लंड यांच्यात ५ सामंजस्य करार, नागरिकांना ५ वर्षांचा व्हिसा दिला जाणार

- राज्यभरात १६ ऑक्टोबरपासून किमान १० टक्के पाणी कपात, रब्बी हंगामातही कमी पाणी लागणाऱ्या पिकांची लागवड करण्याच्या सूचना

- MPSCचे आजी, माजी अध्यक्ष आणि सदस्यांची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्याची मुख्यमंत्र्यांची राज्यपालांना शिफारस

- मुख्य निवडणूक आयुक्तांनी एकतर्फी निर्णय घेतल्याचं आढळून आलं तर ते निर्णय रद्द करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा इशारा

आणि

- मेंदूमधल्या स्मृतींच्या संदर्भात संशोधन करणाऱ्या ३ शास्त्रज्ञांना यंदाचा वैद्यक शास्त्राचा नोबेल पुरस्कार जाहीर

**<><><><><>**

**भारत आणि स्वित्झर्लंडमध्ये आज** ५ सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि स्वित्झर्लंडचे अध्यक्ष गाय पार्मेलिन यांच्यात आज नवी दिल्लीत द्विपक्षीय चर्चेदरम्यान हे करार झाले. या सामंजस्य करारांमध्ये ५ वर्षांसाठी व्हिसा, युवकांना परस्परांच्या देशात संधी, वाहतूक तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य, पायाभूत सुविधांची उभारणी याचा यात समावेश आहे. यामुळे स्वित्झर्लंडला भारतीय कृषी उत्पादनं, औषधनिर्मिती, कापड आणि अभियांत्रिकी वस्तूंची निर्यात वाढायला मदत होईल. जैवतंत्रज्ञान, बँकिंग, विमा, अन्नप्रक्रिया आणि शाश्वतता यासारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये स्वित्झर्लंडकडून भारतात नव्या गुंतवणुकीला चालना मिळेल, असं त्यांनी सांगितलं.

**- - - होल्ड बाइट प्रधानमंत्री - - -**

अणुऊर्जा क्षेत्रात सहकार्य आणखी दृढ करण्यासही दोन्ही देशांनी सहमती दर्शवली आहे. दोन्ही देशांनी लष्करी देवाणघेवाण आणि संरक्षण उत्पादनाच्या क्षेत्रात सहकार्यासाठी

नव्या संधी तयार करण्याचं निश्चित केल्याचं ते म्हणाले. भारत आणि स्वित्झर्लंडच्या मैत्रीपूर्ण संबंधांना अनेक शतकांचा इतिहास असल्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला.

**<><><><><>**

राज्यभरात १६ ऑक्टोबरपासून किमान १० टक्के पाणीकपात लागू करण्याचे निर्देश राज्य सरकारनं आज दिले. या संदर्भातला शासन आदेश आज जलसंपदा विभागानं जारी केला. पुढच्या वर्षीच्या ३१ ऑगस्टपर्यंत पाणी पुरेल या हिशेबानं आवश्यकतेनुसार कपात वाढवावी, असं सरकारनं स्पष्ट केलं. पिण्याचं पाणी, जनावरं आणि चाऱ्याची गरज भागल्यानंतरच उर्वरित पाण्याचं सिंचनासाठी वाटप केलं जाईल. रब्बी हंगामातही कमी पाणी लागणाऱ्या तसंच जास्त चारा देणाऱ्या पिकांना प्राधान्य देण्याचे आदेश सरकारनं दिले आहेत.

औद्योगिक क्षेत्रानं एकूण वापरापैकी किमान ३० टक्के पाण्याचा पुनर्वापर करणं सरकारनं अनिवार्य केलं आहे.

जलस्त्रोतांमधला अनधिकृत आणि बेकायदेशीर उपसा थांबवण्यासाठी तात्काळ विशेष मोहीम राबवावी. यासाठी महसूल, पोलीस आणि जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे नियमित गस्त आणि तपासणी करावी असंही सरकारनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

एमपीएससी अर्थात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी आणि विद्यमान अध्यक्ष, तसंच सदस्यांची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्याची शिफारस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांना केली आहे. उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करावी आणि ३ महिन्यात अहवाल मागवून त्या निष्कर्षांच्या आधारे पुढील कार्यवाही केली जावी, असं शिफारसपत्रात म्हटलं आहे.

**<><><><><>**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना निलंबित करण्याचा अंतरिम आदेश द्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज नकार दिला. तसंच या प्रकरणी केंद्र सरकार, निवडणूक आयोग, ज्ञानेश कुमार आणि उर्वरित २ निवडणूक आयुक्तांना सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या पीठानं नोटिसा बजावल्या. काही निर्णय मुख्य निवडणूक आयुक्तांनी एकतर्फी पद्धतीनं घेतले असं आढळून आलं तर ते निर्णय रद्द करण्याबद्दल विचार करू, असंही पीठानं स्पष्ट केलं.

याशिवाय, मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणादरम्यान वापरलेल्या ६ नंबरच्या अर्जामधल्या बदलांना मान्यता दिलेली नाही, असंही सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं. या अर्जाला जोडलेलं अतिरिक्त घोषणापत्र सर्वोच्च न्यायालयानं वैध ठरवल्याचा दावा, निवडणूक आयोगानं २६ सप्टेंबर रोजीच्या प्रसिद्धीपत्रकात केला होता.

**<><><><>**

न्यायमूर्ती संगीता अग्रवाल, न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अपरेश कुमार सिंह या ३ न्यायाधीशांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती करायला राष्ट्रपतींनी मंजुरी दिली आहे. २८ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने त्यांच्या नावांची शिफारस केली. यामुळं सर्वोच्च न्यायालयातल्या महिला न्यायाधीशांची संख्या ३वर पोहोचली आहे, तर एकंदर न्यायाधीशांची संख्या ३७ झाली आहे.

**<><><><>**

यंदाचा वैद्यकशास्त्राचा नोबेल पुरस्कार अमेरिकेच्या कार्ल डायसेरॉथ आणि जर्मनीच्या पीटर हेगेमॉन तसंच गिऑर्ग नागेल यांना जाहीर झाला आहे. ऑप्टोजेनेटिक्स या तंत्राच्या शोधासाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. मेंदूमध्ये आठवणी, भावना, वर्तवणूक कशाप्रकारे लक्षात ठेवली जाते यासाठी त्यांनी हे संशोधन केलं आहे. सुमारे १२ लाख अमेरिकी डॉलर इतकी या पुरस्काराची रक्कम आहे.

**<><><><>**

ओला -उबर सारख्या ॲप आधारित प्रवास सुविधांचा वापर करणाऱ्या महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी राष्ट्रीय महिला आयोगाने मार्गदर्शक सूचना तयार केल्या आहेत. काम देण्याआधी टॅक्सी चालकाची संपूर्ण माहिती तपासणे, महिला टॅक्सी चालकांची संख्या वाढवणे, प्रत्येक टॅक्सीत आणीबाणीत तात्काळ संपर्कासाठी स्विच ठेवणे, चोवीस तास देखरेखीसाठी टेहळणी केंद्र सुरु करणे, इत्यादी सूचनांचा यात समावेश आहे. आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून या सूचनांची अंमलबजावणी करण्याची विनंती केली आहे.

**<><><><>**

भारत अमेरिका व्यापार करारावर वाटाघाटी अद्याप सुरु असून त्यांना अंतिम स्वरूप आलेलं नाही असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत सुरु असलेल्या

म्युनिक नेत्यांच्या बैठकीत त्या आज बोलत होत्या. सध्या या वाटाघाटी एका टप्प्यावर येऊन थांबल्या आहेत असं त्यांनी सांगितलं. भारताने सादर केलेल्या मसुद्यातील बहुतांश कलमं भारताच्या बाजूने झुकलेली आहेत आणि त्यांवर अमेरिकेकडून सहमती मिळण्यासाठी भारत कसून प्रयत्न करत आहे असं त्या म्हणाल्या.

<><><><><>

निवृत्तीवेतन विभागाने निवृत्ती वेतनधारकांचे अनुभव आणि त्यांना भेडसावणाऱ्या अडचणींतून सतत शिकायला हवं तसंच सध्याच्या प्रणालीतल्या त्रुटी दूर करण्याच्या दिशेने काम करायला हवं, असं केंद्रीय कार्मिक आणि निवृत्तीवेतन मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी आज सांगितलं. नवी दिल्लीत आयोजित सतराव्या अखिल भारतीय निवृत्तीवेतन अदालतीला ते संबोधित करत होते. निवृत्तीवेतनधारक आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी अधिक सोप्या आणि सुलभ सेवांची निर्मिती होण्यासाठी तंत्रज्ञान आणि डिजिटल उपाययोजनांची परिणामकारक अंमलबजावणी आवश्यक असल्याचं ते म्हणाले. या अदालतीमध्ये ८९७ तक्रारींवर विचार करण्यात आला, त्यापैकी ७५६ तक्रारींचे निवारण करण्यात आलं. उर्वरित प्रकरणांच्या निवारणासाठी आगामी काळात कार्यवाही केली जाणार आहे.

<><><><><>

दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात महिला सुरक्षिततेसाठी आणखी प्रभावी प्रतिबंधात्मक उपायांची गरज सर्वोच्च न्यायालयानं आज अधोरेखित केली. या भागात गेल्या काही काळात घडलेल्या घटनांची न्यायालयानं स्वतःहून दखल घेतली आहे. महिलांना रस्त्याने किंवा मेट्रोने प्रवास करताना रात्रीच्या वेळीही सुरक्षित वाटायला हवं, असं न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या पीठानं सांगितलं. बलात्कारासारखे गुन्हे कोणत्याही समाजात घडू नयेत, असंही न्यायालयानं नमूद केलं.

<><><><><>

व्हिएतनाममध्ये झालेल्या १९व्या अंतराळविज्ञान ऑलिम्पियाड स्पर्धेत भारतीय चमूला ४ सुवर्ण आणि १ रौप्यपदक मिळालं. प्रांजल दीक्षित, सुमंत गुप्ता, अक्षत श्रीवास्तव आणि अर्णव सेहरावत यांनी सुवर्ण, तर हर्षिल पटेल यानं रौप्यपदक पटकावलं.

<><><><><>

विमानाच्या इंधनाच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे इंडिगोनं देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानांसाठी इंधन अधिभार शुल्कात वाढ केली आहे.

**//<><><><><>//**